अजय मेहता
भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

व्य.सं./महावितरणं मर्या./ 31088 दिनांक : 10/10/2014

## परिपत्रक

**विषय - पुरवठादारांची / कंत्राटदारांची देयके** RTGS/NEFT पध्दतीने **अदा करणेबाबत.**

संदर्भ - १) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण - १०१०/प्र.क्र.६८/ कोषा प्र-५ दिनांक १८/०४/२०११.

२) परिपत्रक क्र. संचालक (वित्त)/ महावितरण/३१८७५ दिनांक ३०/०९/२००९

महावितरणकडून विविध पुरवठादारांना तसेच कंत्राटदारांना सामुग्री पुरविणे व इतर कामांसाठी आदेश दिले जातात. सदर आदेशाच्या अटी व शर्ती नुसार पुरवठादार किंवा कंत्राटदारांना त्यांची देयके धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट व्दारे अदा करण्यात येतात.

भारतीय रिझर्व्ह बँकेने धनादेशाव्दारे होणारी देवाण-घेवाण व त्यामधील लागणारा अवधी कमी करणेसाठी इलेक्ट्रॉनीक पध्दतीने सदर व्यवहार करण्यासाठी RTGS/NEFT पध्दतीचा अवलंब करणेबाबत सूचना केलेल्या आहेत. याच धर्तीवर सर्व शासकीय कार्यालयाव्दारे देयके अदा करण्यासाठी RTGS/NEFT पध्दतीचा अवलंब करणेबाबत राज्यशासन स्तरावरुन सुध्दा संदर्भ क्रमांक (१) नुसार निर्देश जारी करण्यात आलेले आहेत. सदर बाबतीत महावितरणकडून संदर्भ क्रमांक २ नुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत.

तथापि, असे लक्षात आले आहे की, अजूनही महावितरणच्या काही विभागीय व मंडळ कार्यालयांमध्ये पुरवठादारांची / कंत्राटदारांची देयके ही RTGS/NEFT पध्दतीने देण्यात येत नाहीत. तरी याबाबतीत सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी वरील सूचना त्वरीत अमलात आणाव्यात. यापुढे धनादेश व डिमांड ड्राफ्ट व्दारे देयके अदा करण्याची पध्दत बंद करावी. याबाबतीत सर्व विभागीय, मंडळ व परिमंडळ कार्यालयांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) RTGS/NEFT पध्दतीने देयके अदा करणेसाठीची अट प्रत्येक निविदा तसेच दरपत्रक (quotation) मध्येच अंर्तभूत करण्यात यावी.

२) कंत्राटदार / पुरवठादार यांनी RTGS/NEFT पध्दतीसाठी लागणारी बँक खात्याची माहिती निविदेमध्ये भरुन न दिल्यास सदर निविदा / दरपत्रक (quotation) ग्राह्य धरण्यात येऊ नये.

३) RTGS/NEFT पध्दतीसाठी लागणारी माहिती प्रत्येक कंत्राटदार / पुरवठादार यांचेकडून सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार मागण्यात यावी.

४) कंत्राटदार / पुरवठादार यांची देयके केवळ RTGS/NEFT पध्दतीनेच अदा करावीत.

वरील सूचनांचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे व याबाबतीत कुठल्याही प्रकारची शिथीलता आढळल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सहपत्र : वरील प्रमाणे

Ajay Mehta
**व्यवस्थापकीय संचालक**
**महावितरण**

**प्रती :**
**कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत प्रेषण यादीप्रमाणे**

E:\GM(F&A)\RTGS\Marathi ltr_RTGS_08102014.doc

प्रकाशगड, प्लॉट क्र. जी-९, वांद्रे (पू.), मुंबई-४०० ०५१. (वै.) २६४७४६४४ (कार्या): २६४७४२११ • फॅक्स: २६४७८६७२
हाँगकाँग बँक इमारत, म.गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१. (वै.) २२६१९४९९ (कार्या): २२६१९१०० • फॅक्स: २२६५०७४१
Email: md@mahadiscom.in • Website : www.mahadiscom.in

## - -RTGS Format- -

(ON **Bond Paper of Rs.200/-** dully **notarized**)

I/We here by authorized MSEDCL to released the payment through RTGS instead of Account Payee Cheque as mentioned in the purchase order. Thr details of our bank accounts are given below.

1) Name of the Supplier/Contractor ( As per Bank account)
2) Name of the Bank :
3) Branch with address :
4) Current Account Number : (core banking No, if a/c no starts with zero please put leading zero before A/c No. (00XX)
5) RTGS No/(IFSC Code) : (Indian Financial Security Code)5$^{th}$digit must '0'
6) MICR Code of the bank :
7) Companies email ID :
8) Contact Name & Tel. No. : (Name with designation) Mobile No. if any

Further, I/We hereby undertake that, I/We will be jointly and severally responsible for any loss/expenses arising in making payment under RTGS on above stated bank details. It will be our responsibility to inform/communicate any change in above details.

Signature

( Owner/ Director/Propritor/Designation)

Date: Seal of the co.